13300
21

जा.क्र.नांवाशमनपा/जवमा/ /२०२५
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
दिनांक - 3 1 JAN 2025

## ई - लिलाव सुचना (दुसऱ्यांद)

सर्व जनतेस व व्यापारी बांधवांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील माता गुजरीजी विसावा उद्यान विस्तारीत येथील जागा इनडोअर ॲक्टिव्हिटी, इनडोअर गेम फुड प्लाझा व आऊटडोअर गेम चालविणेसाठी जागेचा मक्ता ताबा तारखेपासून ते पाच वर्षाच्या कालावधी पर्यंत द्यावयाचा आहे.

ईच्छुक नागरिकांनी ई - लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

नागरिकांनी लिलावाची कोरी निविदा किंमत (Tender Fee) रुपये ५०००/- नापरतावा व इसारा रक्कम EMD रुपये ५०,०००/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) च्या स्वरूपात सिलबंद लिफाफ्यात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे दि.03/02/2025...रोजी 15:00..वाजे पासून ते दि.11/02/2025...रोजी 15:00 वाजे पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) मालमत्ता विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, रूम नं. २१५ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या कार्यालयाकडे जमा करावेत.

सदरील मक्त्याच्या नियम व अटी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन वर खरेदी व जमा करण्यात यावे. निविदा फक्त इंटरनेटवर खरेदी करता येतील व ऑनलाईन भरता येतील.

### ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्रं | तपशिल | लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्ध दिनांक | 03/02/2025 | 15:00 |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 03/02/2025 | 15:00 |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 11/02/2025 | 15:00 |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 11/02/2025 | 15:00 |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 12/02/2025 | 18:00 |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 13/02/2025 | 11:00 |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 13/02/2025 | 15:00 |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

-स्वा-
अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रतिलिपी :-
१) संपादक, दै. वास्तव्य २) दै नांदेड टाईम्स (उ) यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील लिलावाची जाहिर सुचना आपल्या दि. 01/2/25.. च्या वृत्तपत्रात 12x12 चौ.मी. आकारात कमीत कमी जागेत प्रसिद्ध करून बिलाच्या २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.
२) मुख्यलेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
४) अंतर्गत लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
५) ई-टेंडरींग/ऑक्शन विभाग, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
६) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे विसावा उद्यान विस्तारीत मधील इनडोअर ॲक्टिव्हिटी, इनडोअर गेम फुड प्लाझा व आऊटडोअर गेम ई-लिलावाने भाडेपट्टीवर देणेसाठी नियम व अटी**

**प्रस्तावना**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे विसावा उद्यान विस्तारीत मधील जागा इनडोअर ॲक्टिव्हिटी, इनडोअर गेम फुड प्लाझा व आऊटडोअर गेमसाठी भाडेपट्टीवर द्यावयाची आहे.

सदर ई-लिलावाच्या बोलीची रक्कम ही मक्ता कालावधीमध्ये अनामत रक्कम म्हणुन महानगरपालिकेकडे जमा असेल. तसेच मासिक भाडे विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | जागेचे विवरण | जागेचे क्षेत्रफळ | बोली अनामत रक्कम | प्रतीमहा भाडे |
|---|---|---|---|---|
| १ | इनडोअर ॲक्टिव्हिटी | २०७.५ चौ.मी | रु.१७,४९,०००/- | रु.१,१६,०४४/- |
| २ | इनडोअर गेम व फुड प्लाझा | ३९६.९ चौ.मी. | | |
| ३ | आऊटडोअर गेम | २३२.३४ चौ.मी. | | |

- **ई-लिलाव अटी व शर्ती -**

१) ई-लिलावात भाग घेण्यासाठी डिजीटल सिग्निचर असणे अनिवार्य आहे.

२) ई-लिलावात भाग घेण्यासाठी व्यक्तीच्या ओळखीचा पुरावा म्हणुन आधार कार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड/ ड्रायव्हींग लायसन्स/पासपोर्ट इत्यादीची प्रत कार्यालयात जमा करावे लागेल. तसेच महानगरपालिका हद्दीतील मालमत्तेचा सालसन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर, पाणी कर इत्यादी भरणा केलेली पावती (महानगरपालिका हद्दीत मालमत्ता नसल्यास त्याबाबतचे लेखी स्वयंघोषणापत्र) तसेच महानगरपालिकेची कोणतीही थकबाकी प्रलंबीत नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र देखील सादर करणे अनॉवार्य आहे.

३) ई-लिलावात भाग घेण्यासाठी रक्कम रु.५,०००/- (ई-लिलाव प्रवेश शुल्क नापरतावा) तसेच इसारा (ईएमडी) रक्कम रु.५०,०००/- असेल. जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन सदर जागा भाडेपट्टीवर घेणार नाहीत अशा बोलीधारकांची इसारा रक्कम रु.५०,०००/- जप्त करण्यात येईल. तसेच बोलीधारकांना जागा मिळाली नाही, त्या बोलीधारकांची इसारा रक्कम परत करण्यात येईल. तसेच जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन सदर जागा भाडेपट्टीवर घेतील त्यांची इसारा रक्कम बोली अनामत रक्कमेमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

४) सदर ई-लिलावातील बोली ही बोली अनामत रक्कम रु.१७,४९,०००/- च्या वर रु.२०,०००/- च्या पटीत बोलणे अनिवार्य आहे.

५) सदर ई-लिलावात सर्वात जास्त बोली बोलणा-या लिलावधारकास जागा भाडेपट्टीवर देण्याची मंजुरी देण्यात येईल. व अंतीम बोली रक्कम महानगरपालिकेकडे जमा राहील.

६) सदर जागेच्या भाडेपट्टीची मुदत ०५ वर्षासाठी राहील.

७) सदर जागा ई-लिलावात अंतीम बोली बोलणा-या बोलीधारकास मंजुर झाल्यावर बोलीची ५० टक्के अनामत रक्कम ०७ दिवसाचे आत महानगरपालिका फंडात भरणा करावी लागेल, व उर्वरीत ५० टक्के अनामत रक्कम जागेचा ताबा देतेवेळेस महानगरपालिका फंडात भरणा करावी लागेल. तसेच सदर अंतीम बोली अनामत रक्कम ही मक्ता कालावधी संपुष्टात येईपर्यंत महानगरपालिकेकडे जमा राहील. तदनंतर सदर जागेचा भाडेपट्टा करारनामा करुन देण्यात येईल. व कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

८) लिलावधारकाने स्वखर्चाने नोंदणीकृत करारनामा महानगरपालिकेस करुन द्यावा लागेल.

९) भाडेपट्टीची मुदत संपुष्टात येण्यापुर्वीच महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता भासल्यास तसे कळवुन सदर जागा रिकामी करुन घेऊन महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल. व याबाबत कोणत्याही न्यायालयात किंवा इतर ठिकाणी दावा/दाद मागणार नाही. त्या बद्दल इतरत्र ठिकाणी बदली जागा मागता येणार नाही.

१०) सदर जागेत पोटभाडेकरु ठेवावयाचा असल्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊनच नियमानुसार पोटभाडेकरु ठेवावा लागेल.

११) महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय भाडेपट्ट्याचे हस्तांतरण परस्पर केले जाणार नाही किंवा मालमत्ता गहाण/तारण ठेवली जाणार नाही. तसेच त्यावर त्रयस्त पक्षाचे हितसंबंध प्रस्थापित/निर्माण करता येणार नाहीत.

१२) सदर जागा वापर करीत असताना भाडेपट्टीवर देण्यात आलेल्या जागेव्यतिरीक्त इतर जागेचा वापर करता येणार नाही. सदर जागेचा वापर फक्त इनडोअर ॲक्टिव्हिटी, फुड प्लाझा व आऊटडोअर गेमसाठीच करावा लागेल.

१३) सदर जागेत अंतर्गत विद्युतीकरणासाठी आवश्यक ते वायरींगचे काम संबंधीतांना महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊनच स्वखर्चाने करुन घ्यावे लागेल. विद्युत मीटर भाडेकरुंना स्वत बसवुन घ्यावे लागेल. तसेच देखभालीसाठी येणारा खर्च संबंधीतास स्वत भरणा करावा लागेल. याबाबतीत भाडेकरुस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१४) महानगरपालिकेचे जागा भाडे, मालमत्ता कर व इतर कर नियमीत भरणा करणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडुन व्यवसाय परवानाही घ्यावा लागेल.

१५) सदर जागेमध्ये / बांधकामामध्ये महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही. तसेच रंगरंगोटीसाठी येणारा खर्च भाडेकरुस स्वत: करावा लागेल.

१६) सदर भाडेपट्टीवर घेतलेल्या जागेमधील भाडेकरु यांचे साहित्य चोरी गेले. नैसर्गिक आपत्तीमुळे, आगीमुळे नष्ट झाले, पुरामुळे नुकसान पावले, भुकंपामुळे नष्ट झाली किंवा इतर कारणाने खराब झाले तर त्या जिवीत व वित्त हानीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१७) सदर जागेचे भाडे ०६ महिन्यापेक्षा जास्त दिवस थकीत राहिल्यास आपली अनामत रक्कम जप्त करुन भाडेपट्टा रद्द करण्यात येईल

१८) बोलीधारकांनी बोललेल्या अंतीम बोली रक्कमेमध्ये काही तांत्रिक किंवा बोलीधारकाने कार्यालयात सादर कागदपत्रामध्ये तफावत आढळल्यास अंतीम बोलीधारक ठरविण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

१९) ई-ऑक्शन या संकेतस्थळावर प्राप्त झालेली बोलीची नोंद हीच अंतीम असेल.

२०) सदरील ई-लिलाव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा, नियम अटीमध्ये अंशत: बदल करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना राहील. त्याबाबत लिलावधारकास कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

२१) सदर ई-लिलाव https://eauction.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येत आहे.

२२) सदरील नियम अटी https://eauction.gov.inया संकेतस्थळावर तसेच www.nwcmc.gov.in या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर, मनपा मुख्य प्रशासकिय इमारत येथे नोटीस बोर्डवर, मुख्य प्रशासकिय इमारत मालमत्ता विभाग (कक्ष क्र.२१५) इत्यादी ठिकाणी पहावयास मिळतील.

अतिरीक्त आयुक्त

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**